मुल्य ₹ ४०
डिसेंबर २०११

पशुपालन व दुग्धव्यवसाय विशेषांक

असेल सोबत मासिक

# गोडवा शेतीचा

तर होईल विकास शेती आणि शेतकऱ्यांचा



शेती व शेतकऱ्यांच्या विकासाचे ध्येय बाळगणारे मासिक


* पुणे * वर्ष ७ वे * अंक ११ वा



## राजेंद्र सुर्यवंशींनी बांधलेला इस्त्राईल तंत्रज्ञानाने मुक्त गोठा







# शेतक-यांच्या हितासाठी ठीबक सिंचन तंत्रज्ञानाचा याही पुढे सरकारने पुरस्कार करणे गरजेचे- केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार
## आप्पासाहेब पवार पुरस्काराचे शानदान वितरण

**जळगाव - दि. (प्रतिनिधी)** - खते, बि- बियाणे यांच्या सतत वाढणा-या किंमतीमुळे कृषी क्षेत्र अडचणीत सापडले असून या तुलनेत जैन इरिगेशनने शेतक-यांशी बांधिलकी कायम जपत गेल्या पाच वर्षांपासून वाढत्या महागाईत वस्तुंच्या किंमती कमी करून सामान्य शेतक-यांना तंत्रज्ञान वापरण्याची ताकद देण्यात पुढाकार घेतला असल्याचा गौरव केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी केला. भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाउंडेशन यांच्यावतीने देण्यात येणा-या पद्मश्री स्व. डॉ. आप्पासाहेब पवार कृषी उच्च-तंत्र पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्याच्या वाघापूर येथील महिला शेतकरी सौ. मनिषा भाऊसाहेब कुंजीर यांना हा पुरस्कार देण्यात आला. राज्याचे सहकार व संसदीय कार्यमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या भव्य सोहळ्यास वैद्यकीय शिक्षण व फलोत्पादन मंत्री डॉ. विजयकुमार गावीत, जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत भवरलालजी जैन, पालकमंत्री गुलाबराव देवकर, विरोधी पक्ष नेता एकनाथराव खडसे, आमदार सुरेशदादा जैन, खासदार ईश्वरलालजी जैन, खा. हरिभाऊ जावळे, खा. ए.टी. नाना पाटील, फाउंडेशनचे विश्वस्त ना. धों. महानोर मनिषाताईंचे पती भाऊसाहेब सर्जेराव कुंजीर यावेळी उपस्थित होते.

कृषी क्षेत्रापुढे निर्माण झालेल्या विविध आव्हानांवर मात करण्यासाठी उच्च तंत्रज्ञानाच्या पुरस्कारासमवेत कृषी विषयक साक्षरताही वाढविणे गरजेचे असल्याचे कृषी मंत्री म्हणाले. भारतातील ६० टक्के कृषी क्षेत्र हे कोरडवाहू आहे. या मोठ्या कृषी क्षेत्रावर अवलंबून असलेल्या शेतकरी वर्गाला जगविण्यासाठी उच्च तंत्रज्ञानाची जोड महत्त्वाची आहे. सामान्य शेतक-यांच्या विकासासाठी ठिबक सिंचनाचे उच्च तंत्रज्ञान सरकारला याही पुढे कायम न्यावेच लागेल, त्याची कास सोडता येणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. भारतातली कृषी क्षेत्रात आजही महिलांचा सिंहाचा वाटा असून कृषी क्षेत्रातील एकूण श्रमाचा विचार केल्यास ६४ टक्के श्रम हे महिलांचे असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. उच्च कृषी तंत्रज्ञानामुळे कापसाला आता बरे दिवस आल्याचे त्यांनी सूचीत केले. १९८० मध्ये काढण्यात आलेल्या



सौ. मनिषा व भाऊसाहेब कुंजीर यांना केंद्रीय कृषी मंत्री शरदराव पवार यांच्याहस्ते पुरस्कार प्रदान करतानाचा क्षण.. डाविकडून उजवीकडे खासदार ईश्वरलालजी जैन, आ. सुरेशदादा जैन, फलोत्पादन मंत्री डॉ. विजयकुमार गावीत, माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर, विरोधी पक्ष नेता एकनाथराव खडसे, सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, कविवर्य ना. धों. महानोर, पालकमंत्री गुलाबराव देवकर आणि खा. हरिभाऊ जावळे.

कापसाच्या दिंडीचा हवाला देत त्यांनी त्याकाळी ३०० रूपयांचा भाव मिळाला पाहिजे या मागणीची आठवण करून दिली. उच्च तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आजच्या घडीला ७ ते ८ हजार रुपयांपर्यंतचा भाव क्विंटलमागे कापूस उत्पादक शेतक-यांनी मिळविल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. शेतक-यांच्या मालाला मिळणारा भाव आजच्या घडीला समाधानकारक जरी वाटत असला तरी याच्या उत्पादनासाठी लागणा-या बि-बियाणे, खतांच्या वाढलेल्या खर्चाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली.

आप्पासाहेब पवारांच्या नावे असलेला हा पाचवा पुरस्कार एका महिला शेतकरीला मिळाल्याने या माध्यमातून कृषी क्षेत्रात राबणा-या सर्व महिलांचा गौरव झाला असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केले. योगायोगाने पुरस्कारार्थी मनिषा कुंजीर या माझ्या जिल्ह्यातल्या असल्याने या जिल्ह्याचा रहिवासी म्हणून मला अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले. आजही शेतक-यांच्या कल्याणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची नितांत आवश्यकता आहे. दिवसेंदिवस शेतीसाठी भांडवलाची गरज भासू लागली आहे. हे लक्षात घेता सरकारने ४ लाख ८६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून त्यातील २० हजार कोटी रुपयांचा निधी पीक कर्जाच्या माध्यमातून यावर्षी शेतक-यांना दिला असल्याचे ते म्हणाले. राज्यात १ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज बिनव्याजी केले असून ३ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाला केवळ १ टक्का व्याज दिल्याचे सांगून मध्य मूदत कर्जाच्या व्याजात काही सवलत मिळेल का याचा विचार सुरु असल्याचे त्यांनी सूतोवाच केले. सौ. मनिषा कुंजीर यांनी शेतीसाठी घेतलेल्या कष्टाचा आणि अंगिकारलेल्या नवतंत्रज्ञानाचा आवर्जून उल्लेख त्यांनी केला.

ज्यांनी शेत, शेती आणि शेतकरी यांच्यासाठी जीवन ओतलं त्यांच्यापैकी आप्पासाहेब पवार यांचं नाव अग्रभागी घ्यावे लागेल. अमेरिकेच्या फ्रेस्नो येथील पहिल्याच भेटीत त्यांनी मला तुमचा जन्म आमची कृषी क्षेत्रातील स्वप्न पूर्ण करण्यासाठीच असल्याचे सांगितले होते. त्यांचे हे वाक्य माझ्या आयुष्याला कलाटणी देणारे ठरले असे जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत भवरलालजी जैन यांनी प्रास्ताविकात सांगितले. जगाचा पोषिंदा असलेल्या शेतक-याला प्रतिष्ठा मिळाली नाही. ही प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी हा सर्वोच्च पुरस्कार सुरु केल्याचेही त्यांनी सांगितले. याच बरोबर कृषीमंत्री पवारसाहेबांच्या योगदानामुळे शेतक-यांना शेतमालाला चांगला भाव मिळाला असल्याचे ते आवर्जून सांगावयास विसरले नाहीत. या पुरस्काराच्या निवडीसाठी निवड समितीने अडिच हजार किलोमिटरचा प्रवास करून ताईंची निवड केली.

राज्यातील कोरडवाहू जमिनी फलोत्पादन योजने अंतर्गत बहरण्यासाठी जैन इरिगेशनच्या उच्च कृषी तंत्रज्ञानाची मोलाची मदत झाली असून जैन टिश्यूकल्चरनेही यात मोलाची भूमिका बजावल्याचे वैद्यकीय आणि फलोत्पादन मंत्री डॉ. विजयकुमार गावीत यांनी सांगितले. जैन इरिगेशनने केवळ ठिबक पुरता विचार न करता शेतक-यांचा सर्वांगिण विकास करून त्यांच्या गरजेनुसार उच्च तंत्रज्ञानात सुलभता आणली. विक्रीसोबत प्रशिक्षण व त्याच्या जोडीला नवनवीन वाणाचीही जोड दिल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी क्षेत्राकडे अधिक डोळसपणे पाहण्याची दृष्टी पुरुषांच्या तुलनेत महिलांकडे अधिक चांगली असून महिलांचे योगदान कमी लेखता येणार नाही असे विरोधी पक्षनेते एकनाथराव खडसे यांनी सांगितले. भारतीय कृषी क्षेत्राच्या विकासासाठी जैन ठिबक तंत्रज्ञानाने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावल्याचा गौरवही त्यांनी केला. भारतातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी पवार साहेबांनी राजकारणापलीकडे व्यापक भूमिका घेतल्याचा उल्लेखही त्यांनी केला. उच्च कृषी

पान क्रमांक ३३ वर पहा


**ओम प्लॅस्टिक इंडस्ट्रीज**

* उत्पादक *

उत्कृष्ट दर्जाचा मल्चिंग पेपर
(सिल्व्ह / ब्लॅक)
सर्व प्रकारचे नर्सरी बॅग, ग्राफ्टींग पेपर

विक्रेता–

* सिल पॉलीन, शेड नेट माफक दरात होलसेल मिळतील.
* गांडूळ खत बेड, * रायपनींग चेंबर
* शेततळी बनवून देण्यात येतील.

तसेच प्लॅस्टिक पिशव्यांची छपाई केली जाईल.

ग्रुप बुकिंग करणाऱ्यांस खास सवलत

संपर्क– सुधीर तलाठी –९४२२६६०९८३
पत्ता– मु. पो. जालगाव, बाजारपेठ,
ता. दापोली, जि. रत्नागिरी
फोन– ०२३५८–२८४३७५


JAIN IRRIGATION SYSTEMS LTD. JALGAON

# केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्याहस्ते जैन बायोगॅस वीज निर्मिती प्रकल्पाचे उद्‌घाटन अशा प्रकारच्या प्रकल्पाची भारताला नितांत गरज - शरद पवार

जळगाव - दि. (प्रतिनिधी) भविष्यातील वीजेची गरज लक्षात घेता विद्युत निर्मितीच्या प्रकल्पांची भारताला नितांत गरज असून जैन इरिगेशनने बायोगॅस पासून वीज निर्मिती करण्यात पुढाकार घेत देशाला मोठा हातभार लावल्याचे केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी सांगीतले. जैन इरिगेशनच्या जैन व्हॅलीस्थीत एनर्जी पार्क येथे आकारास आलेल्या बायोगॅस एनर्जी प्रकल्पाचे उद्‌घाटन केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या हस्ते व राज्याचे सहकार व पणन मंत्री हर्षवर्धन पाटील, फलोत्पादन व वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ. विजयकुमार गावीत यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन, खासदार हरिभाऊ जावळे, खासदार ए. टी. नाना पाटील, फलोत्पादन आयुक्त गोरखसिंग, आमदार सुरेशदादा जैन, उपाध्यक्ष अशोक जैन, व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन, अतुल जैन, प्रकल्पाचे वरिष्ठ अधिकारी सुनिल देशपांडे, सौर ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी गिरधरभाऊ ओसवाल, चरित्र जैन आदी मान्यवर उपस्थित होते.

अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत असलेल्या या प्रकल्पाची कृषी मंत्री शरद पवार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण माहीती घेतली. या प्रकल्पाच्या तंत्रज्ञानाचे माहिती देणारे सात मिनीटांचे सादरीकरणही त्यांनी समजून घेतले. प्रक्रिया करून उरलेल्या जैविक घणकच-याच्या व्यवस्थापनात अशा प्रकारचे प्रकल्प पर्यावरणाच्या दृष्टीनेही मोलाचे असल्याचे त्यांनी सांगीतले. जैन फूडपार्क येथील फळ, भाजीपाला तसेच कांदा निर्जलीकरण प्रकल्प आणि शेतीच्या उत्सर्जीत पदार्थांपासून या बायोगॅस प्रकल्पात सुमारे १.७ मेगा वॅट वीज निर्मिती आणि सोबतच दररोज १० मे.टन सेंद्रीय खत निर्मिती केली जात आहे. भारत सरकारद्वारे प्रमाणित देशातील सर्वात मोठा कार्यान्वित असलेला हा व्यापारी तत्वावरील भारतातील एकमेव बायोगॅस



वीज निर्मिती म्हणून गणला गेला आहे.

जळगाव येथे जैन इरिगेशनचे देशातील सर्वात मोठे फळ व भाजीपाला प्रक्रिया प्रकल्प असून आंब्यावर प्रक्रिया करणारा जगातील क्रमांक एक चा प्रकल्प म्हणून तो ओळखला जातो. फळ प्रक्रिया तसेच भाजीपाला व कांदा निर्जलीकरण प्रकल्पाच्या व शेतीपासून निर्माण होणा-या सुमारे २०० मे.टन टाकावू पदार्थांचा उपयोग करून बायोगॅस (जैव वायू) निर्माण केला जातो. बायोगॅस पासून वीज निर्मिती करण्याबाबतची कल्पना जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत भवरलालजी जैन यांनी मांडली. या दोन्ही प्रकल्पांसाठी लागणा-या वीजेची निर्मीती पर्यावरणाला हानी न पोहचता कशी करता येईल याबाबतचे स्वप्न आदरणीय भवरलालजी जैन यांनी पाहिले होते. उत्सर्जीत पदार्थांची विल्हेवाट लावण्यासाठी हे पदार्थ जमिनीत गाडणे अथवा जाळून नष्ट करणे म्हणजे पर्यावरणाला हानी पोहचविण्यासारखे होते. ही हानी टाळण्यासाठी पर्यावरण पूरक असलेला बायोगॅस प्रकल्प निर्माण करण्यात आला. या प्रकल्पात सुमारे २८ तंत्रज्ञ सहकारी तीन शिफ्टमध्ये काम करतात. हा प्रकल्प प्रायोगित तत्त्वावर असल्यामुळे १८ ते २० कोटी रुपये खर्च आला आहे. पुढील प्रकल्पासाठी १२ ते १५ कोटी रुपये लागतील. आज विजेचा दर प्रतियुनिट सरासरी ७ ते ८ रुपये इतका दर आहे. या प्रकल्पातून ही वीज निर्मिती चार ते साडेचार रुपये प्रती युनिट खर्चाने तयार करण्यात यश मिळाले आहे.

फळ प्रक्रिया आणि भाजीपाला व कांदा निर्जलीकरण प्रक्रिया प्रकल्पासाठी लागणा-या एकूण विजेच्या ३० टक्के विजेची गरज या प्रकल्पातून पूर्ण होणार आहे.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये -**

- भारत सरकारद्वारे प्रमाणित देशातील सर्वात मोठा कार्यान्वित एकमेव बायोगॅस वीज निर्मीती प्रकल्प.
- फळ प्रक्रिया प्रकल्पातील फळ, भाजीपाला यांच्या टाकाऊ साल व शेत - काडीकच-यापासून केली जाते वीज निर्मिती.
- एकूण १.७ मेगावॅट वीज व १० टन दर्जेदार सेंद्रीय खतांची निर्मिती ***

---

**पान क्रमांक ३१ वरुन**

तंत्रज्ञानाच्या मदतीने असंख्य शेतक-यांचे जीवनमान सुधारले आहे. सौरऊर्जेसारखे तंत्रज्ञान सामान्य शेतक-यांच्या आवाक्यात येण्यासाठी सरकारने प्रोत्साहन देण्याची गरज असून त्यांनी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांना विनंती केली. पवारसाहेब यात पुढाकार घेतील असा विश्वासही त्यांनी बोलून दाखविला.

पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर, कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. लवंदे, फलोत्पादन आयुक्त गोरख सिंग आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

आप्पासाहेब पवार पुरस्कार विजेत्या सौ. मनिषा कुंजीर यांना पैठणी, शाल, चांदीचे श्रीफळ देऊन सौ. ज्योति अशोक जैन यांनी पारंपरिक पद्धतीने ओटी भरून सत्कार केला. केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्याहस्ते कुंजीर दाम्पत्यास आप्पासाहेब पवार पुरस्काराचे स्मृतिचिन्ह व १ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. अशोकभाऊ जैन यांच्याहस्ते मनिषा कुंजीर यांचे पती भाऊसाहेब कुंजीर यांचाही यथोचित सत्कार केला.

**वैशिष्ट्ये-**

* जागतिक पातळीवर कच्च्या मालाच्या किंमती वाढूनही शेतक-यांशी बांधिलकी जपत जैन इरिगेशनने किंमती कमी करून सामान्य शेतकरी वर्गाला मोठा दिलासा दिला आहे. -केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार.

* आमची जात, धर्म, पक्ष हा एकच. तो म्हणजे शेत, शेती आणि शेतकरी, व्यासपीठावर सर्व पक्षातील मान्यवरांची उपस्थितीचे हे याचेच द्योतक आहे. - भवरलाल जैन

* शेतक-यांच्या कल्याणासाठी जैनच्या आधुनिक तंत्रज्ञानाची नितांत आवश्यकता. - सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील

* सामान्य शेतक-यांच्या विकासात जैन ठिबकचे योगदान मोलाचे असून सौर ऊर्जेला चालना देण्यासाठी सरकारने प्रोत्साहन देण्याची गरज. - एकनाथराव खडसे.

* साडेसात हजार शेतक-यांची उपस्थिती. यात जळगाव, धुळे, नंदूरबार, जालना, अकोला बुलढाणा, नाशिक, पुणे, सांगली या जिल्ह्यातील शेतकरी वर्गासह महिला शेतक-यांचाही सहभाग. ***

Dec.2011
RNI NO. MAHMAR2006/17261
Posted at MKT. Yard PSO Pune 37
On Every 7th of the Month

Regd No. PNCW/M-135/2010-2012




## ठळक वैशिष्ट्ये

- अर्धा एच.पी. पासून २४ एच.पी. क्षमतेपर्यंत सोलरपंप उपलब्ध
- सूर्याच्या दिशेने फिरणारी सोलर पॅनल्सची स्वयंचलित यंत्रणा
- साधारणपणे ऋतूनुसार दररोज ७ ते ११ तासापर्यंत पंप कार्यरत
- रात्री विजेवर चालविण्याची सोय*
- पाण्याच्या पातळीनुसार ऑटोमॅटिक चालू/बंद करण्याची सोय
- बँक नियमानूसार कर्ज उपलब्ध*

**ठिबकसोबत सहजपणे जोडता येतो**

| एचपी | किंमत# (सबसिडी वजा जाता) | डिस्चार्ज** (लिटर/प्रतिदिवस) |
|---|---|---|
| ०.५ | ₹ १,२०,२९७ | ९,००० |
| १ | ₹ २,८९,०८० | २८,५०० |
| २ | ₹ ३,२८,३०६ | ५५,००० |
| ३ | ₹ ४,३६,४४३ | ८५,००० |
| ४ | ₹ ६,६४,२५७ | १,२७,००० |
| ५ | ₹ ७,१३,१११ | १,४५,००० |

टीप
**वरिल डिस्चार्ज ३० मीटर हेड साठी आहे. हेड वाढल्यास पंपाकडून मिळणारा डिस्चार्ज कमी होईल. त्याचप्रमाणे हेड कमी असल्यास डिस्चार्ज वाढेल.

# वरील किंमत ही फक्त सूचक असून वास्तविक किंमत क्षेत्र/शेत, पिक, वास्तविक पाहणी, नकाशा आणि प्रत्यक्ष जागा यांचा विचार करूनच देण्यात येईल. अतिरिक्त सुविधांसाठी लागणारा खर्च शेतक-याला करावा लागेल.

*अटी लागू

अधिक माहिती व बुकिंगसाठी

जैन जीवन सोलर पंप | जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. कल्पना कणापरी, ब्रम्हांडाचा भेद करी.® | जैन ग्रीन एनर्जी

जैन ग्रीन एनर्जी पार्क, पो.बॉ. २०, जळगाव-४२५००१. **दूरध्वनी:** ०२५७-६६३०६२०;
**सतीश:** ९४२२७७६६९२ **केतन:** ९४०३०८०१२० **दीपक:** ९४२२७७५९४१ **देवदत्त:** ९४२२७७६९८५
**ई-मेल:** solarpump@jains.com; **संकेतस्थळ:** www.jains.com ; **फॅक्स:** ०२५७-२२६११५५

जैन पाईप | जैन ठिबक | जैन पीई पाईप | जैन स्प्रिंकलर | जैन टिश्यूकल्चर | जैन ग्रीन हाऊस | B-SURE | FARMFRESH

Jainart 10/11

गोडवा शेतीचा हे मासिक मुद्रक,प्रकाशक–मालक व संपादक सौ.प्रीतीकिरण काटोले यांनी श्रीराम ऑफसेट, धायरीगाव ,पुणे ४११०५१ येथे छापुन १५, दत्त पॅलेस,बालाजीनगर पी.एम.टी.बसस्टॉपमागे,पुणे सातारा रोड,धनकवडी, पुणे ४११०४३ येथुन प्रकाशित केले